# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-४४१** **दिनांक: २७/१२/२०२३**

## ब्राऊन शुगर (गर्दा) हा अंमली विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगणाऱ्या दोन आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

दिनांक २१/१२/२०२३ रोजी रात्रौ १९.०० वा. च्या सुमारास पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा.पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली कि, तडीपार इसम नामे - १) शहाआलम बद्रीआलम चौधरी, वय २४ वर्षे, २) अब्दुल्ला अलीमुल्ला चौधरी, वय ३७ वर्षे, हे मफतलाल कंम्पाऊन्ड, नवजिवन शांतीनगर, ता.वसई जि. पालघर येथे ब्राऊन शुगर (गर्दा) नावाचा अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता येणार असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली होती.

सदर बातमीच्या अनुषंघाने सहा. पोलीस निरीक्षक सोपान पाटील, यांनी मा. वरिष्ठांना सदरबाबत माहिती दिली असता मा. वरिष्ठांनी बातमीची सत्यता पडताळणी करुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. सदर आदेशान्वये बातमीच्या अनुषंघाने पोलीस निरीक्षक श्री.शिवानंद देवकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, व पोलीस पथक यांनी मफतलाल कंम्पाऊन्ड, नवजिवन शांतीनगर, ता.वसई जि. पालघर येथे सापळा रचुन सदर ठिकाणी ब्राऊन शुगर (गर्दा) या अमंली पदार्थाची बेकायदेशिर रित्या विक्री करीता आलेल्या तडीपार इसम नामे -१) शहाआलम बद्रीआलम चौधरी, वय २४ वर्षे, व त्यांचा साथिदार २) अब्दुल्ला अलीमुल्ला चौधरी, वय ३७ वर्षे, यांना ताब्यात घेऊन त्यांची पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यात १५.५०० ग्रॅम वजनाचा १,५५,०००/- रु किमंतीचा ब्राऊन शुगर (गर्दा) हा अंमली पदार्थ मिळुन आला असुन नमुद आरोपीत यांचे विरुध्द दिनांक २२/१२/२०२३ रोजी पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ११०५/२०२३ एन.डी.पी.एस. ॲक्ट- १९८५ चे कलम - ८(क), २१(ब), सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक/तुकाराम भोपळे हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, पोहवा. योगेश देशमुख, पोहवा/तानाजी चव्हाण, पो.अं. संजय मासाळ, रवि वानखेडे, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, निखिल मंडलिक, अनिल साबळे, सुजय पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.